# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : २७ फेब्रुवारी २०२४

## ( बैठक क्र. ६५ )

### (विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीतील बैठक)

| अक्र | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | **अभ्युदय नगर मधील म्हाडा इमारतींचा समूह पुनर्विकास** | गृहनिर्माण |
| २ | **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालयांमध्ये जेनेरिक औषधी केंद्रे सुरु करणार** | वैद्यकीय शिक्षण |

## अभ्युदय नगर मधील म्हाडा इमारतींचा समूह पुनर्विकास

अभ्युदय नगर (काळा चौकी) येथील म्हाडा इमारतींचा समुह पुनर्विकास करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या इमारतींचा एकल पुनर्विकास केला जाणार नाही.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीनुसार म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करण्यात येतो. म्हाडा वसाहतीतील मुख्य रस्त्यालगत व मोक्याच्या ठिकाणी असलेल्या इमारतीचा पुनर्विकास जलद गतीने होत आहे. परंतु आतील बाजूस व मोक्याच्या ठिकाणी नसलेल्या इमारतींचा पुनर्विकासही जलद गतीने होणे गरजेचे आहे. म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करताना उत्तम दर्जाच्या इमारती व सोयी सुविधा निर्माण होण्याच्या दृष्टीने संपूर्ण वसाहितीचा एकत्रित पुनर्विकास होणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता, या म्हाडा वसाहतीतील इमारतींचा म्हाडामार्फत विकासकाची नियुक्ती करुन समूह पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या वसाहतीचे एकूण क्षेत्रफळ ४००० चौ.मी. पेक्षा अधिक असल्याने पुनर्विकास प्रकल्प ४ चटई क्षेत्रफळ निर्देशांक आणि १८ मी. रुंदीचा रस्ता या अटीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येणार आहे. या वसाहतीला मंजूर करण्यात येणाऱ्या ४ च.क्षे.नि. पैकी ३ च.क्षे.नि. च्या वरचा उर्वरित १ च.क्षे.नि. गृहसाठ्याच्या स्वरुपात मंजूर करण्यात येणार आहे. त्यामुळे अतिरिक्त चटई क्षेत्रफळापोटी म्हाडास प्राप्त होणारा गृहसाठा किमान आधारभूत ग्राह्य धरून, म्हाडास अधिकाधिक गृहसाठा देणाऱ्या व निविदेच्या आर्थिक व भौतिक अटींची पूर्तता करणाऱ्या विकासकाची पुनर्विकासासाठी नियुक्ती करण्यात येणार आहे.

या वसाहतीचा पुनर्विकास म्हाडाने निविदा पध्दतीने अंतिम केलेल्या विकासकामार्फत होणार असल्याने नियुक्त करण्यात येणाऱ्या विकासकास वसाहतीतील एकूण सभासदांच्या ५१ टक्के संमती पत्रे म्हाडास सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

या प्रकल्पांमधील मूळ गाळेधारकांचे, रहिवाशांचे पुनर्वसन करणे, त्यांच्या तात्पुरत्या निवासाची सोय करणे किंवा तात्पुरत्या निवासासाठी पर्यायी जागेचे भाडे देणे (ट्रांझीट रेंट), कॉर्पस फंड इत्यादी जबाबदारी पुनर्विकास प्रकल्पासाठी नियुक्त विकासकाची राहील.

-----०-----

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**रुग्णालयांमध्ये जेनेरिक औषधी केंद्रे सुरु करणार**

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालयांमध्ये जेनेरिक औषधी केंद्रे सुरु करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यातील गरीब आणि वंचित समाजाला औषधांवर करावा लागणारा खर्च कमी करून त्यांना दर्जेदार औषधे उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात जेनेरिक औषधी केंद्र सुरु करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यानुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील १८ शासकीय वैद्यकीय/ दंत महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये नॅकोफ इंडिया लि., एचएलएल लाईफ केअर, एचएससीसी इंडिया लि. या संस्थांमार्फत जेनेरिक औषधी दुकाने सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----